# <u>रे. क. नं. २२/२०१५ मधील निशाणी १७ वरील आदेश</u>

१. वादीने सदरचा अर्ज कोर्ट कमिशनर यांच्या नियुक्तीसाठी केला आहे. सदर आदेश सदर अर्जावर असल्याने अर्जातील मजकुराची पुनरावृत्ती टाळत आहे.

२. निशाणी १८ येथे म्हणणे देवून प्रतिवादी याने सदर अर्जास हरकत उभारली आहे. त्यांचे कथन असे आहे की, वादी पुरावा गोळा करण्याचा प्रयत्न करीत आहे. प्रतिवादीने ४ ते ६ इंच रुंद जागा मोकळी सोडून त्याच्या घराच्या पूर्वेकडील बाजूस भिंत बांधली आहे. अशा परिस्थितीत वादीच्या सिटी सर्व्हे नंबर २७० मध्ये अतिक्रमण करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

३. वादीच्या वतीने सुवैद्य वकील आर. आर. चव्हाण यांचा युक्तिवाद ऐकला तर प्रतिवादीच्या वतीने सुवैद्य वकील ए. बी. रेडेकर यांचा युक्तिवाद ऐकला.

४. सदरचा दाव्यात अतिक्रमणाबाबत वादीचे कथन असल्याने अशा दाव्यात अतिक्रमण टाळण्यासाठी कोर्ट कमिशनर नेमणे आवश्यक आहे. त्यामुळे कोर्ट कमिशनरचा अर्ज दिला याचा अर्थ वादी पुरावा गोळा करण्यासाठी प्रयत्न करतो असे म्हणता येणार नाही. युक्तिवादाच्या वेळी प्रतिवादीच्या वकीलांनी मोजणी करायची तर दोन्ही मिळकतीची करावी असा युक्तिवाद केला. दाव्यात वस्तुस्थिती पाहता माझ्या मते दोन्ही वादीची व प्रतिवादीची मिळकतीची मोजणी करण्यासाठी कोर्ट कमिशनर नेमणे आवश्यक वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करतो.

## <u>आदेश</u>

१. निशाणी १७ च्या अर्जातील मागणी कलमात नमूद केलेल्या कारणासाठी तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांनी सुध्दा सर्व्हे नंबर २७०, क्षेत्र १०१.२ चौरस मीटर यालाच महागांव मिळकत नंबर ९६३ ची मोजणी करावी व प्रतिवादीच्या घर मिळकत नंबर ९६२ याला सिटी सर्व्हे नंबर २६९ ची मोजणी करुन त्यात अतिक्रमण आहे किंवा कसे हे दाखवून तसेच वादातील भिंत नेमकी कोठे आहे हे दाखवून एकत्रित मोजणी नकाशा अहवालासह सादर करण्यात यावा. सदर दोन्ही घरे सिटी सर्व्हे नंबर २७० व २६९ मध्ये नेमकी कोठे आहे हे सुध्दा दर्शविण्यात यावे.

२. वादी, प्रतिवादी यांना मोजणी पूर्व नोटीस काढण्यात याव्यात.

३. वादीच्या सर्व्हे नंबरची मोजणी फी वादीने तर प्रतिवादीच्या सर्व्हे नंबरची मोजणी फी प्रतिवादीने आजपासून पंधरा दिवसांच्या आत तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांच्याकडे भरावयाची आहे.

४. वादी, प्रतिवादी कमिशन फीची रक्कम थेट टी.आय.एल.आर. कार्यालयात भरायची आहे.

५. कमिशन रिट पाठविण्यात यावे.

सही/—
(ए.बी.होडावडेकर)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
गडहिंग्लज

गडहिंग्लज
दिनांक—०३.०१.२०१७